# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

बायपास रोड,कॅम्प, अमरावती ४४४६०२

दुरध्वनी ०७२१-२६६२०६२ फॅक्स ०७२१-२६६२७८२

ईमेल:dcg_amravati@rediffmail.com वेबसाईट:http//amravatidivision.gov.in

---

क्रमांक/आकाअ/साप्रवि/लेखा २/कावि. 270/२०२० दि. ~~२०/०२/२०२०~~ 06.03.2020

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,
अमरावती.

विषय:-- शासकीय कर्मचारी यांना वैद्यकिय देयाकाचे प्रतिपूर्ती करिता ३% शुल्क न आकारण्याबाबत

संदर्भ:-- १) शासन निर्णय वैदयाकिय शिक्षण व औशधी द्रव्ये विभाग दिनांक १८ जानेवारी २००२

२) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक २८/१२/२०१५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयातील तरतुदी नुसार शासकीय कर्मचारी यांना वैद्यकिय देयाकाचे प्रतिपूर्ती करिता ३% शुल्क आकारणी करण्यात येवू नये असे नमूद आहे. सदर शासन निर्णयातील परिशिष्ठ- अ मध्ये शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार ज्या सवंर्गाना विनाशुल्क वैद्यकिय उपचाराची सवलत देण्यात आलेली आहे. त्या बाबतच्या यादीमध्ये अनुक्रमांक ०१ मध्ये शासकीय कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणारे कुटुंबीय यांना सदर शुल्क लागू नसल्याचे नमूद आहे. तसेच वरील संदर्भ क्र. २ चे शासन निर्णयातील पृष्ठ क्र. ४८ वर सुध्दा ३% शुल्क शासकिय कर्मचारी व त्यावर अवलंबून असणारे कुटुंबिय यांना लागू असणार नाही. असे नमूद आहे. त्यामुळे शासकिय कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणारे कुटुंबिय यांचे वैद्यकिय प्रतिपुर्ती देयकाकरीता ३% शुल्क आकारणी करण्यात येवू नये अशा सुचना आपलेस्तरावरुन संबधितांना निर्गमित करावा.

(पीयूष सिंह)
विभागीय आयुक्त,
अमरावती

प्रत,

१) उपसंचालक आरोग्य अमरावती विभाग अमरावती,अकोला यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक अमरावती यांना आवश्यक निर्देश त्वरित देऊन तसे या कार्यालास अवगत करावे.